**वाचले :**

१. सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.निप्रआ-१११९/ प्र.क्र.८६/११-अ, दि.१४ ऑक्टोबर, २०११.

२. सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.निप्रआ-१११८/ प्र.क्र.११/११-अ, दि.०९ जुलै, २०१९.

३. निलंबन आढावा समितीचा दि- ०४/१०/२०२४ रोजीचा सभावृतांत.

४. मा.आयुक्त सो यांचेकडील दिनांक. ११ /१०/२०२४ रोजीचा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, सामान्य प्रशासन विभाग,
क्र.साप्रवि/९/कावि/८७६/२०२४
दिनांकः ११ /१०/२०२४.

**विषय :<u>सेवानिलंबन रद्द करुन सेवेत पुनःस्थापित करणेबाबत..</u>**

**आदेश,**

**ज्याअर्थी**, महापालिका स्तरावर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना लाच-लुचपत व इतर प्रकरणी दाखल फ़ौजदारी गुन्हा व कामकाजातील अनियमिता प्रकरणी खालील तपशिलात दर्शविलेल्या कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्र ४ मध्ये नमुद आदेशानुसार सेवानिलंबित करुन त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

**आणि ज्याअर्थी**, प्रकरणी उपरोक्त वाचले क्र १ व २ चे शासन निर्णयातील तरतुदीच्या अनुषंगाने निलंबित कर्मचा-यांचा निलंबनाचा आढावा घेण्याकरिता विषय/प्रकरण निलंबन आढावा समिती समोर सादर करणेत आलेले होते.त्यानुसार वाचले क्र ३ अन्वये खालील अ.क्र १ वरील निलंबित कर्मचा-यांना विभागीय चौकशी व अ.क्र २ ते ३ कर्मचा-यांना त्यांचेविरुध्द दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने मे.न्यायालयाचे अंतिम निर्णयाच्या अधिनस्त निलंबन रद्द करुन त्यांना अकार्यकारी पदावर व जनसंपर्क येणार नाही अशा ठिकाणी पुनःस्थापित करणेकामी समितीने सर्वानुमते शिफ़ारस केलेली आहे.यास्तव खालील नमुद अपचारी कर्मचा-यांचे निलंबन रद्द करणे आवश्यक आहे.

| अ. क्र | निलंबित सेवकाचे नाव | पदनाम | सेवानिलंबन आदेश क्र. व दिनांक | पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | श्री.वाटाडे सुनिल पांडुरंग | मुख्य आरोग्य निरिक्षक | साप्रवि/९/कावि/२८०/२०२३ दि-१५/०६/२०२३. | आरोग्य |
| २. | श्री.दिलिप भावसिंग आडे | अनुरेखक | साप्रवि/९/कावि/१४६/२०२३ दि-२४/०३/२०२३. | निवडणूक |
| ३. | श्री.मांजरे किरण अर्जुन | सहाय्यक उद्यान निरिक्षक | साप्रवि/९अ/कावि/२७८/२०२३ दि-१४/०६/२०२३. | उद्यान व वृक्षसवंधन |

त्याअर्थी, मी,आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,प्रस्तुत आदेशान्वये उपरोक्त वाचले क्र १ व २ मधील शासन निर्णयातील तरतुदी व वाचले क्र ३ च्या निलंबन आढावा समितीच्या सभावृतांतील नमुद शिफ़ारशी विचारात घेता,<u>उपरोक्त अ.क्र १ येथील अपचारी कर्मचा-यांचे निलंबन विभागीय चौकशी व अ.क्र २ ते ३ कर्मचा-यांचे निलंबन विभागीय चौकशी व मा.न्यायालयाचे अंतिम निर्णयाचे अधिनस्त खालील नमुद अटी व शर्तीस अधिन राहुन रद्द करणेस व स्तंभ क्र ५ येथे नमुद विभागात त्यांना पदस्थापना देणेस मान्यता देत आहे</u>.उक्त कर्मचा-यांनी स्थानांतरण केलेल्या विभागात तात्काळ रुजु होवुन रुजु अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

<u>अटी व शर्ती:</u>

१. उपरोक्त अधिकारी/कर्मचा-यांचे वेतन व भत्ते पदस्थापना देण्यात आलेल्या विभागाकडुन रुजु झालेल्या दिनांकापासुन अदा करणेत यावे.

२. उपरोक्त अ.क्र १ येथील नमुद अपचारी कर्मचारी/अधिकारी यांचे निलंबन विभागीय चौकशी व अ.क्र २ ते ३ येथील अपचारी यांची विभागीय चौकशी व त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रकरणी दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिनस्त रद्द करुन त्यांना सेवेत पुनःस्थापित करणेत येत आहे.

३. उपरोक्त कर्मचा-यांपैकी ज्यांचेविरुध्द फ़ौजदारी तथा लाचलुचपत प्रकरणी गुन्हा दाखल आहे त्यांचे निलंबन कालावधीबाबत विभागीय चौकशी व मे.न्यायालयाचे अंतिम निर्णयानंतर अलहिदा निर्णय घेण्यात येईल.तोपर्यंत निलंबन कालावधी नियमित करणेबाबत सामान्य प्रशासन विभागास अर्ज करु नये.अ.क्र १ येथील अपचारी यांचे निलंबन कालावधीबाबत अलहिदा निर्णय घेणेत येईल.

४. उपरोक्त नमुद अ.क्र २ ते ३ अपचारी कर्मचारी यांचे न्यायालयीन निर्णय प्राप्त होणेसाठी पाठपुरावा करण्याची जबाबदारी सबंधित विभागप्रमुखां बरोबरच अपचारी यांची देखिल राहील.मे.न्यायालयाचे निर्णय प्राप्त होताच तात्काळ सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.मे.न्यायालयीन निर्णय जाणुनबुजुन उशिरा सादर केल्याचे निदर्शनास आल्यास सबंधिताविरुध्द अलहिदा शिस्तभंगविषयक कारवाई करणेत येईल.

**५. सर्व विभागप्रमुखांना सुचित करण्यात येते कि.अ.क्र २ ते ३ येथील अपचारी कर्मचा-यांची नेमणूक अकार्यकारी पदावर करणेत येत आहे.यास्तव त्यांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक स्वरुपाशी सलंग्न व जनसंपर्क येईल अशा स्वरुपाचे कामकाज देण्यात येवु नये.याबाबतची दक्षता सबंधित विभागप्रमुखाने काटेकोरपणे घ्यावी.**

६. उपरोक्त नमुद अपचारी कर्मचारी यांना निःसंदिग्धपणे समज देण्यात येते कि,त्यांना सेवेमध्ये रुजु करुन घेतल्यानंतर पुनःश्च त्यांचेकडुन कार्यालयीन गैरवर्तन अथवा आर्थिक अनियमितता केल्याचे आढळुन आल्यास त्यांचेविरुध्द गंभीर शास्तीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.

७. प्रस्तुत आदेशाची नोंद सबंधितांचे सेवानोंद पुस्तकात सविस्तरपणे घेण्यात यावी.व त्याची छायांकित सत्यप्रत व आदेश बजाविणेत आल्याची पोहोच सामान्य प्रशासन विभागात तात्काळ सादर करणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
१. सबंधित कर्मचारी

प्रत,
२. **सबंधित विभाग**.
२/-प्रस्तुत आदेश संबंधितास तात्काळ बजाविण्यात येऊन त्याची स्वाक्षांकीत पोहोच या कार्यालयास सादर करण्यात यावी.

३. सामान्य प्रशासन विभाग टेबल क्र ३,,१२,१४,

४. **सामान्य प्रशासन संगणक कक्ष.**
२/- संगणकावरील नोंदीस्तव.